## भरण्यात येणारी पदे- आयुष वै. अधिकारी- बीएएमएस/ बीयूएमएस/बीडीएस आणि बीएचएमएस

राष्ट्रीय आरोग्य अभियान, सिंधुदुर्ग अधिनिस्त खालील नमुद करणेत आलेली मनुष्यबळ भरती कोवीड - 19 उपचारासाठी जिल्हयात कोरोनाचा कोवीड - 19 वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी प्रभावी आरोग्य सेवा देण्याकरिता DCHC, CCC येथे कोवीड - 19 साथीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत खालील प्रस्तावित पदांना 30/06/2021 पर्यंत नेमणूक देणेकरिता अटी व शर्थीमधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेनुसार विहित ई मेल आयडीवर अर्ज मागविणेत येत आहेत. प्रथम नियुक्ती दि.30/06/2021 पर्यंत दिली जाईल.

जे आयुष वैदयकिय अधिकारी पदांसाठी विहित उमेद्वार आहेत जे उमेद्वार डिसीएचसी/ सीसीसी या कोवीड केअर सेंटरचे ठिकाणी काम करु इच्छित आहेत त्यांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार मुदतवाढ देणेत येईल.

| अ.क्र. | मुळ संवर्ग | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन | पदे कार्यरत करावयाची ठिकाणे |
|---|---|---|---|---|
| 1 | आयुष वैदयकिय अधिकारी | BAMS/BUMS/BDS/BHMS (Medical Council Registration) | रु. 30,000/- | DCHC / CCC |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमितपणे प्राप्त होणा-या भरतीबाबतचे मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेद्वारांनी नोंद घ्यावी.

२) सदर सेवा निव्वळ कोवीड - 19 उपचारासाठी तसेच जिल्हयातील उद्रेक सदृष्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणा-या अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता लक्षात घेऊन ठराविक कालावधीसाठी आहेत. भरावयाची पदे राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. उपरोक्त शै. अर्हतेनुसार नियुक्ती करणेत आलेल्या वै. उमेद्वारांना एनएचएम पदभरतीमध्ये हक्क सांगता येणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे कोणतेही अधिकार नियुक्त उमेद्वारास राहणार नाहीत. वैदयकिय तातडीची गरज म्हणून बीएचएमएस अर्हताधारकांना संधी देणेत येत आहे. तसेच कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांना राहील.

३) सार्वजनिक आरोग्य विभागातुन सेवानिवृत्त कर्मचारी विहित वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हतेचा निकष पुर्ण करीत असतील तर अर्ज करु शकतील.

४) उपरोक्त रकान्यात नमुद केलेनुसार आयुष वैदयकिय अधिकारी या पदांसाठी शैक्षणिक अर्हता पुर्ण करणा-या उमेद्वारांनी आपले अर्ज व विहित शैक्षणिक अर्हताधारक प्रमाणपत्रके एकत्र स्कॅन करुन एकच पीडीएफ फाईल करुन covidhrsindhudurg@gmail.com या ई- मेल आयडीवर दि-05/05/2021 सायंकाळी 06.00 पर्यंत पाठविण्या यावेत.

५) निवड झालेल्या उमेद्वारांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचा-यांप्रमाणे राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या अटी व शर्थी रु. 100/- चे बॉन्डपेपरवर लिहून करारनामा सादर करणे बंधनकारक आहे.

६) वयोमर्यादा- वैदयकिय अधिकारी या पदांची भरतीसाठी कमाल वयोमर्यादा 61 वर्षे व सेवा समाप्तीची मर्यादा 70 वर्षे राहिल. 60 वर्षावरील अर्जादारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरिक योग्यतेचे प्रमाणपत्रक (मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट) सादर करणे अनिवार्य राहिल.

७) उमेद्वारांना गुणांकन यादी विहित शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या 70 टक्के प्रमाणे गुण, उच्च शैक्षणिक अर्हतेसाठी 10 गुण व शासकीय अगर निमशासकीय अनुभवासाठी वर्षाला 4 गूण याप्रमाणे एकूण 20 गुण अशा प्रकारे 100 गुणांचे मुल्यांकन करणेत येईल. पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यापासून 48 तासांत रुजु होणे अपेक्षित आहे.

८) कोवीड 19 साठी पदांचे आवश्यकतेनुसार प्रतिक्षा यादीचे क्रमांकानुसार उमेद्वारांना नियुक्ती आदेश देय राहतील.

९) अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१०) शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारची प्रशासकीय/ वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

११) भरती प्रकियेतील सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेजवळ राखुन ठेवणेत आलेले आहेत.

01/05/2021

जिल्हा आरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग